# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १)**

**(१) श्री. निलेश राणे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सिंधुदुर्ग जिल्हयात जवळजवळ ४२२४२ हेक्टर क्षेत्रावर सन १९९६ साली वनसंज्ञा लादण्यात येणे, संपूर्ण राज्यात ६२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, परंतु त्यावेळी फक्त एकटया सिंधुदुर्ग जिल्हयात ४२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, त्यामुळे जिल्हयातील अनेक गावे, बाजारपेठा, मंदिरे, शाळा, दवाखाने, शेत जमिनी, बागायती आदि वनसंज्ञेखाली दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्हयाचा विकास खुंटला असणे, सर्व विकास कामे ठप्प झालेली असणे, जिल्हयात असलेल्या डोंगर द-यांमुळे विकास होईल असे जमीन क्षेत्र शिल्लक न राहणे, चुकीच्या पध्दतीने वनसंज्ञा /वन नोंद झाल्यामुळे सद्यस्थितीत जिल्हयातील ३०० पेक्षा जास्त गावे विकासापासून वंचित राहिलेली असणे, शेतक-यांच्या हक्काच्या जमीनी असूनही त्यांना लाभ घेता येत नसणे, अनेकदा शेतक-यांच्या जमिनी शासकीय कामाकरिता संपादित केल्या जाणे परंतु वन नोंदीमुळे त्याचा शेतक-यांना मोबदला न मिळणे, सदर मोबदला शासन जमा होणे, वनसंज्ञा व वन नोंदी झाल्यामुळे शेतक-यांची अवस्था ना जमिनी, ना शेती, ना मोबदला अशी होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतक-यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली चिड, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सिंधुदुर्ग जिल्हयात नव्याने सर्व्हेक्षण करुन प्रत्यक्षातील वनक्षेत्र, खाजगी वनक्षेत्र व वनसंज्ञा यांची नव्याने नोंद करुन शेतक-यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री. राजकुमार बडोले, चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, राजु तोडसाम, मंगेश चव्हाण वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ग्रामीण भागात जवळपास प्रत्येक घरांत एकेकाळी बांबूच्या वस्तु जसे की चाळण्या, टोपल्या, सूप, झाडू, चटई व धान्य साठवणूकीसाठी पेटया इ.वस्तु घरगुती वापरासाठी बाळगण्यात येत असणे, कालांतराने प्लॅस्टीकच्या वस्तुने बाजारपेठ काबीज केल्यामुळे ग्राहकांचा कल प्लॅस्टीककडे झुकला असल्याने बांबूच्या वस्तुंची मागणी मोठया प्रमाणात घटत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू लागवडीवर भर देण्याबरोबरच बांबूच्या वस्तुंना शासनाने बाजारपेठ, दर, शासकीय खरेदी व प्रचार-प्रसाराची व्यवस्था करणे आवश्यक असणे, प्लॅस्टीकमुळे होणारे प्रदुषण व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचे धोके लक्षात घेऊन बांबू वस्तुंचा वापर वाढविणेबाबत अनेक तज्ञांनी वेळोवेळी आपापली मते व्यक्त केली असणे, यास्तव राज्य शासनाच्या वतीने बांबू लागवड वाढवून रोजगार निर्मिती व त्यावर अवलंबून असणाऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्यासाठी विशेष नियोजन करण्याचे शासनाकडून सांगण्यात येणे, मात्र शासनाने या योजनेबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू व्यवसायिक तसेच बांबू कारागीरांचा प्रश्न आर्थिकदृष्टया ऐरणीवर आला असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, परिणामी प्लॅस्टीकमुळे पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम तसेच अनेकांना हा पारंपारीक व्यवसाय सोडावा लागल्याचे निदर्शनास येणे, बांबू व्यवसायिक व बांबू कारागीर यांचा विचार करुन या बांबू व्यवसायास चालना देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. अभिमन्यु पवार, अमित साटम, काशिनाथ दाते, हारुन खान, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री चेतन तुपे, दौलत दरोडा, प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, शंकर मांडेकर, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितीन राऊत, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. विकास ठाकरे, संजय मेश्राम, तानाजी मुटकुळे, नारायण पाटील, अभिजीत पाटील, सुभाष देशमुख, विजय रहांगडाले, संजय पुराम, विनोद अग्रवाल, रोहित पाटील, राजेश मोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १२६७ शाळांपैकी जवळपास ६२४ शाळा खोली असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या असणे, अनेक शाळांची दुरवस्था झाल्याने धोकादायक झालेल्या असणे, लातूर जिल्ह्यातील ११६ शाळांची वीज जोडणी थकीत बिलामुळे खंडित केलेली असणे, बहुतांश शाळांना संरक्षण भिंत / खेळाचे मैदान, मुला मुलींसाठी शौचालय नसणे, शिपाई व सफाई कर्मचारी नसल्याने शाळा व शौचालयांमध्ये स्वच्छता नसल्याने दुर्गंधी असणे, अनेक शाळेत किचन शेड

नसणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. (CCTV) यंत्रणा बसविलेली नसणे, शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आणि शिक्षकांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झालेला असणे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कला, क्रीडा व कार्यानुभव विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त नसणे, लातूर जिल्ह्याप्रमाणे संपूर्ण राज्यात ९०% जिल्हा परिषद शाळांची स्थिती अशीच असणे, राज्यातील खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये प्रशस्त इमारत व सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने पालकांचा खाजगी शाळेत प्रवेशासाठी ओढा असणे, राज्यातील जिल्हा परिषद शाळांची पुनर्बांधणी करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रत्येक शाळेत इंटरनेट सुविधा, खेळाचे मैदान, सौर प्रकल्प, सी.सी.टी.व्ही., शुद्ध पाणी, रिक्त पदांची भरती, सर्व शाळेत कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षक नियुक्ती, शाळेच्या स्वच्छतेसाठी प्रत्येक शाळेत शिपाई नियुक्ती करण्यासाठी मान्यता आणि विशेष निधी उपलब्ध करून देणे व शाळा पुनर्बांधणी योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री. रोहित पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधतील** :-

"राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बेदाणा निर्मितीवर अवलंबून असणे, यावर्षी हवामानातील प्रतिकूल परिस्थिती, उत्पादनातील घट आणि वाढलेला खर्च यामुळे बेदाण्याचे एकूण उत्पादन कमी झालेले असणे, परिणामी बाजारात उपलब्धता मर्यादित असल्याने सध्या स्थानिक बेदाण्याला चांगला दर मिळत असला तरी बाहेरील अनेक देशांमधून कमी दराने तसेच काही ठिकाणी बेकायदेशीर मार्गाने बेदाणा महाराष्ट्रात येत असल्याच्या तक्रारी सातत्याने निदर्शनास येत असणे, अशा आयातीमुळे राज्यातील बाजारपेठेत दरावर दबाव निर्माण होत असणे व स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अपेक्षित भाव मिळत नसणे, त्यामुळे द्राक्षातून बेदाणा तयार करणाऱ्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत परतावा कमी असल्याने बेकायदेशीर आयात रोखण्यासाठी सीमाशुल्क यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता, आयात होणाऱ्या बेदाण्यावर कडक गुणवत्ता तपासणी लागू करणे, आवश्यक असल्यास आयात शुल्कात वाढ करणे तसेच स्थानिक उत्पादकांच्या संरक्षणासाठी विशेष बाजार हस्तक्षेप धोरण राबविण्याबाबत भूमिका घेण्यासाठी राज्यशासनाने कार्यवाही करणे गरजेचे असणे, यासंदर्भात राज्यातील शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.कृषिमंत्री यांचेकडे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही व उपाययोजना केली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असणे, राज्यातील बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचे हित सुरक्षित राहावे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये कामगार विभागाकडील नोंदणी असलेल्या कामगारांना गृहपयोगी साहित्य वाटप करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडीअडचणी येत असून त्यांची योग्यरीत्या नोंदणी करून त्यांना सदर साहित्य मिळत नसल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली असणे, सदर योजनेंतर्गत एका दिवसामध्ये सुमारे ५०० कामगारांना साहित्यांचा वाटप होत असताना वाटप ठिकाण कमी असल्यामुळे व जिल्ह्याच्या ठिकाणी फक्त एक किंवा दोन सेंटर असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी येत असणे, जिल्ह्यातील सर्व कामगार त्या ठिकाणी पोचत असल्यामुळे साहित्यांचे वाटपामध्ये मोठी गैरसोय होत असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्व कामगारांकडून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सदर साहित्य वाटप केंद्र सुरू करण्याची मागणी होत असणे, याविषयी कामगार विभागामार्फत कोणती कार्यवाही न होणे उलट ज्या ठेकेदाराला संबंधित काम देण्यात आलेले आहे तो कामगारांची कोणतीही शहानिशा न करता प्रत्येक माणसाला साहित्य वाटप करत असल्याची बाब देखील समोर येत असणे, याविषयी शासनाच्या विभागाकडे व संबंधित जिल्हाधिकारी तसेच कामगार अधिकारी यांच्याकडे तक्रार होत असणे, त्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, त्यामुळे या सर्व साहित्य वाटपाची चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**सहा : (शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर,**

**विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri **२०२६**' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले

असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**सात : (शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी

राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.